ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 26 ] [ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 4
Total No. of Questions : 26 ] [ Total No. of Printed Pages : 4

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 242-M (NS)**
**Code No. : 242-M (NS)**

# ಶಿಕ್ಷಣ
# EDUCATION
# ರೂಢಿಯಾಗಿ ಶಿಕ್ಷಣ
# EDUCATION AS PRACTICE

(ಮರಾಠಿ ಭಾಷಾಂತರ)
( Marathi Version )

**(ಹೊಸ ಪಠ್ಯವಸ್ತು)**
**( New Syllabus )**

ದಿನಾಂಕ : 05. 06. 2017 ]
Date : 05. 06. 2017 ]

ಸಮಯ : ಮಧ್ಯಾಹ್ನ 2.00 ರಿಂದ 5.00 ರವರೆಗೆ ] [ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 60
Time : 2.00 P.M. to 5.00 P.M. ] [ Max. Marks : 60

*ಅಭ್ಯರ್ಥಿಯ ನೋಂದಣಿ ಸಂಖ್ಯೆ*
*Register Number of the Candidate*

## भाग - I

खालील प्रत्येक प्रश्नाला **चार** पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य ते पर्याय उत्तर निवडा आणि उत्तर-पत्रिकेमध्ये उत्तर लिहा. सर्व प्रश्न सक्तीचे आहेत. 10 × 1 = 10

1. आपल्या राज्यामध्य पाठ्यक्रम आणि अभ्यासक्रम तयार करण्याची जबाबदारी या संस्थेवर आसते

(A) KSQAAC (B) KSEEB

(C) DSERT (D) DIET.

2. अध्यापनाचा परिवर्तन सराव पाहण्यासाठी डीवीच्या ( Dewey's ) कल्पना उपयोगात आणण्यास सांगणारे हे आहेत.

(A) रॉबर्ट गॅग्ने (B) गिब्ज

(C) जॉन्सन (D) अँड्र्यू पोलार्ड.

3. रचनावादी अध्यापनशास्त्राकरीता शालेय संस्कृतीमध्ये असणारे घटक हे आहेत.

(I) सर्जनशील विचाराना संधी देणे

(II) श्रेष्ठता स्वभावाकरिता

(III) चुका होणार नाहीत याकरिता काळजी घेणे

(IV) शिक्षकाना स्वातंत्र्य देणे.

(A) I, II आणि IV

(B) I आणि III

(C) I, II आणि III

(D) I, III आणि IV.

4. शिक्षकाने सखोल आकलनासाठी अध्ययनकर्त्याला मार्गदर्शन करणाऱ्या कृतीची योजना ही आहे.

(A) गुंतविणाऱ्या कृती
(B) वर्णन करणाऱ्या कृती
(C) शोधक कृती
(D) मौल्यमापन कृती.

5. साधन सामग्री वापरण्याचा मुख्य हेतू हा आहे.

(A) विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यासाठी
(B) अध्ययनाच्या सूलभीकरणासाठी
(C) अध्ययन आकर्षित करण्यासाठी
(D) अध्यापनाचे पुरक वातावरण बनविण्यासाठी.

6. सह-सहकारी अध्ययनाचे उपयोग

(I) मुलाला तिच्या किंवा त्याच्या स्थरातील घडणाऱ्या विकासामध्ये मदत करण्याकरिता

(II) अध्यापन-अध्ययन प्रक्रियेमध्ये अधिक सह-सहकारोयता पुरविण्यासाठी

(III) गटामध्ये अध्ययन करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी

(IV) विद्यार्थ्याना अध्ययनामध्ये एकमेकास मदत करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी.

(A) I, III आणि IV

(B) II आणि IV

(C) I आणि II

(D) II, III आणि IV.

7. शाळच्या अभिवृद्धीमध्ये खालीलपैकी हे चिकित्सक ( critical ) आहे.

(A) कर्मचाऱ्याची नेमणूक
(B) कर्मचाऱ्यांचे स्वयं-अध्ययन
(C) कर्मचाऱ्यांतील सहकारी भावना
(D) कर्मचाऱ्याना दिलेल्या सुविधा.

8. NCF 2005 च्या शिफारशीनुसार मुलांच्या ज्ञानात्मक रचनेतील अडथळा हा आहे.

(A) प्रश्न विचारणे
(B) कंठ पाठ अध्ययन
(C) आत्मावलोकन
(D) सहकारी अध्ययन.

9. समरसतेचा ( empathy ) आवश्यक घटक हा आहे.
   (A) मानसिक स्थिरता (B) मतभिन्न विचार
   (C) परिणामाची अपेक्षा (D) संवेदनशीलता.

10. 'तणाव रहित अध्ययन' ही या अहवालाची शिफारस आहे.
   (A) कोठारी अहवाल (B) वुडचा अहवाल
   (C) यशपाल अहवाल (D) मूडलीयर अहवाल.

## भाग - II

खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नांचे उत्तर **अर्ध्या** पानापेक्षा जास्त असू नये : $5 \times 2 = 10$

11. तुम्ही तुमच्या विद्यार्थ्यांच्यामध्ये स्व-जागृती हे कौशल्य कसे विकसित कराल ?
12. वर्गखोलीतील घडामोडीना मार्गदर्शन करणाऱ्या स्थान पत्रिकेत सूचविलेल्या कोणत्याही दोन तत्वांचे वणन करा.
13. शिक्षक हे 'अष्टपैलू' असावे. का ?
14. कोणत्या घटकानी उत्तम शाळा दिनदर्शिका निश्चित होते ?
15. व्हिगॉट्स्कीच्या ज्ञानात्मक विकास सिद्धांताचे कोणत्याही दोन मुद्यांचे वर्णन करा.
16. शाळत सहभागी निर्णय घेण्याच्या महत्वाचे वर्णन करा.
17. तुम्ही तुमच्या विद्यार्थ्यांच्यामध्ये सर्जनशील चिंतनाचे संगोपन कसे कराल ?
18. शालेय अभ्यासक्रम घडामोडीत पाठ्य पुस्तकाची भूमिका कशी असावी ?

## भाग - III

खालील प्रत्येक प्रश्नाला पर्यायी प्रश्न दिलेला आहे. त्यापैकी एकाचे उत्तर लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर **एका** पानापेक्षा जास्त असू नये : $8 \times 5 = 40$

19. समावेशक, अध्ययन मैत्रीपूर्ण वर्ग खोली तयार करण्यासाठी तुम्ही कोणते उपाय हाती घ्याल, त्यांची चर्चा उदाहरणासह करा.

**किंवा**

'तणाव रहित अध्ययन' मध्ये मौल्यमापनाच्या भूमिकेचे पाच मौल्यमापन साधनांच्या उदाहरणासह चर्चा करा.

20. तुमच्या निकट सेवेशी आधारीत अनुभवावर शाळा व्यवस्थापन पद्धतीमध्ये खालील मुख्य प्रक्रियांच्या महत्वाचे वर्णन करा :'
   i) दृष्टीकोन ( visioning )
   ii) योजना ( planning ) ।

**किंवा**

शाळा ही उत्तम संघटना बनविण्याकरिता खालील घटकांच्या भूमिकेचे वर्णन करा :
   i) आंतरिक संपर्क ( Inter-linkage ) आणि भागीदारी ( partnership )
   ii) साधन सामग्री.

21. चिकित्सक अध्यापनशास्त्र वापरताना शिक्षक या नात्याने तुमच्या निवडीच्या घटकात तुमच्या विद्यार्थ्यांना तुम्ही पुरविलेल्या पाच अनुभवाविषयी लिहा.

**किंवा**

तुम्ही तुमच्या निवडीच्या पाठाच्या सुलभीकरण साठी कृती आधारित अध्ययन पद्धतीचा कसा वापर कराल ? कोणत्याही पाच मार्गांची उदाहरणे द्या.

22. मानवी संपत्ती ही अध्ययन संपत्ती आहे. कशी ? उदाहरणासह वर्णन करा.

**किंवा**

अध्ययन सामग्री सौंदर्याभिरुची संवेदना कशी विकसित करते ? उदाहरणासह स्पष्टीकरण करा.

23. मूले केंद्रीत ( child centered ) अध्यापनशास्त्राची कोणताही पाच गुण वैशिष्टयाचे वर्णन करा.

**किंवा**

शिक्षकाला वर्गखोली प्रक्रियेत परावर्तनक्षम नियतकालीक ( Journal ) कशाप्रकारे मदत करते ? स्पष्टीकरण करा.

24. तुमच्या निवडीच्या घटकाकरिता कोणत्याही पाच अध्ययन सामग्रीची निवड करा. चिकित्सकपणे तुमच्या निवडीचे विश्लेषण करा.

**किंवा**

कृती या अध्ययन सामग्री ( संपत्ती ) आहेत. उदाहरणासह विश्लेषण करा.

25. रचनावाद वर्गखोली ही पारंपरिक वर्गखोलीपेक्षा कशी वेगळी आहे ? उदाहरणासह कोणत्याही पाच गुण वैशिष्ट्यांचे स्पष्टीकरण करा.

**किंवा**

अध्ययनकर्त्या केंद्रित वर्गखोली निर्माण करण्यात शिक्षकाची भूमिका आणि जबाबदारी याचे स्पष्टीकरण करा.

26. तुम्ही तुमच्या विद्याथ्यामध्ये अस्तित्वात असलेली निर्णय घेण्याची कौशल्ये कशी ओळखाल ?

**किंवा**

तुमच्या विद्यार्थ्यांमध्ये तणावाच्या निवारणाचे कौशल्य तुम्ही कसे विकसित कराल ? उदाहरणासह चर्चा करा.